# २००० नंतरची कविता स्वरूप आणि आकलन



संपादक
डॉ. मारोती कसाब

सहसंपादक
डॉ. अनिल मुंढे

Shivaji C

Scanned by PDF Scan

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

# २००० नंतरची कविता : स्वरूप आणि आकलन

संपादक

डॉ. मारोती कसाब

मराठी विभाग, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

सहसंपादक

डॉ. अनिल मुंढे

मराठी विभाग, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

सिद्धी पब्लिकेशन हाऊस, नांदेड.

PRINCIPAL
Shivaji College, HINC

Scanned by PDF Scanner

ISBN No. 978-81-953976-4-8

२००० नंतरची कविता : स्वरूप आणि आकलन

संपादक

डॉ. मारोती कसाब

सहसंपादक

डॉ. अनिल मुंडे

प्रकाशक

सिद्धी पब्लिकेशन हाऊस

६२४, बेलानगर, भावसार चौक,

तरोडा (खु.) नांदेड - ४३१ ६०५.

मो. ९६२३९७९०६७

मुद्रक

अनुपम प्रिंटर्स, श्रीनगर, नांदेड.

मो. ९९७५३२४४३७

प्रथमावृत्ती : २६ नोव्हेंबर २०२१

सर्वाधिकार : महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर

मुखपृष्ठ : संतोष धोंगडे

अक्षरजुळवणी : डॉ. राजेश उंबरकर

मूल्य : ३००/-

Scanned by PDF Scanner

SHIVAJI COLLEGE HINGOLI

ISBN No. 978-81-953976-4-8

२००० नंतरची कविता : स्वरूप आणि आकलन

संपादक

डॉ. मारोती कसाब

सहसंपादक

डॉ. अनिल मुंढे

प्रकाशक

सिद्धी पब्लिकेशन हाऊस

६२४, बेलानगर, भावसार चौक,

तरोडा (खु.) नांदेड - ४३१ ६०५.

मो. ९६२३९७९०६७

मुद्रक

अनुपम प्रिंटर्स, श्रीनगर, नांदेड.

मो. ९१७५३२४४३७

प्रथमावृत्ती : २६ नोव्हेंबर २०२१

सर्वाधिकार : महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर

मुखपृष्ठ : संतोष घोंगडे

अक्षरजुळवणी : डॉ. राजेश उंबरकर

मूल्य : ३००/-

Scanned by PDF Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | कृषी कृषक जीवन वेदना: "मौन सक दे उन्हाचा" | डॉ. सुभाष सदाशिव पुलावळे | १२४ |
| १६. | २००० नंतरच्या शेतकऱ्यांचे जीवन चित्रण : विशेष संदर्भ 'कुणब्याच्या पोरा' | डॉ. बालाजी विठ्ठलराव [illegible] | १३० |
| १७ | 'जोनाचे ते आम्ही': ग्रामीण जीवनाची गाथा | डॉ. मारोती बालासाहेब भोसले | १४० |
| १८. | 'शिंपल्यातील मोती' : प्रबोधनाचा जागर घालणारी कविता | डॉ. मारोती कसाब | १४९ |
| १९. | जागतिकीकरण आणि २००० नंतरची दलित कविता | डॉ. सूर्यकांत हरिश्चंद्र शिंदे | १५५ |
| २०. | २००० नंतरच्या कवितेतील वास्तव दर्शन | डॉ. श्रीराम मारोतराव कऱ्हाळे | १६४ |
| २१. | नातीगोती सांभाळत सुगीचे दान देणारी कविता : "सुगीभरल्या शेतातून" | शरद ठाकर<br>डॉ. अशोक पाठक | १६८ |
| २२. | उपेक्षितांच्या वेदनेचा आशावादी हुंकार - मारोती कसाबांची कविता | डॉ. प्रल्हाद भोपे | १७४ |
| २३. | २००० नंतरच्या कवितेतील प्रतिमा विशेष संदर्भ श्रीकांत देशमुख यांची कविता | डॉ. शिवसांब कापसे | १८२ |
| २४. | कविता महाजनांच्या 'मृगजळातील मासा' या काव्यसंग्रहातील प्रतिमा | बीणा गुलदेवकर | १८७ |
| २५. | मराठवाड्यातील मराठी ग्रामीण कवितेतील अभिव्यक्ती | साईप्रसाद मधुकर पंडीत | १९३ |
| २६. | २००० नंतरच्या आदिवासी कवितेतील एकलव्य | ज्ञानेश्वर नगाजी भडंगे | १९९ |
| २७. | २००० नंतरचे साहित्य : कलाकृतीच्या अनुषंगाने | प्रा. बालाजी जी. गायकवाड | २०५ |
| २८. | वसंत बहाराची अपेक्षा असलेला काव्यसंग्रह : बिकॉज वसंत इज कमिंग सून | डॉ. राजकुमार किशनराव वल्लावाड | २११ |
| २९. | २००० नंतरच्या काव्यातील मिथक संकल्पना | आश्लेषा सचिन कुंभार | २१९ |



SHIVAJI COLLEGE • HINGOLI •
PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI
Scanned by PDF Scanner

# २००० नंतरच्या कवितेतील वास्तव दर्शन

डॉ. श्रीराम मारोतराव कऱ्हाळे
मराठी विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

२००० नंतर च्या कवितेतून आलेल्या वास्तव जीवनाचा वेध आपल्याला पुढीलप्रमाणे घेता येतो. साहित्य हा समाजाचा आरसा असतो. समाजामध्ये घडणाऱ्या घडामोडीचा तो एक आलेख असतो. ज्या काळातील साहित्य निर्माण होते त्या काळाचं वास्तव प्रतिबिंब त्या साहित्यात पडताना दिसते. तो प्राचीन काळा असो अर्वाचीन काळ असो की आज २००० नंतर साहित्य असो. या सर्व साहित्यामध्ये समाजाचं वास्तव दर्शन घडत असते.

कविता हा कवीच्या आत्म्याचा उद्गार असतो. कवीही इतरांसारखा समाजव्यवस्थेमध्येच राहात असतो; पण सुदैवाने त्याला इतरांपेक्षा वेगळी संवेदनशीलता नियतीने दिलेली असते. त्यामुळे त्याच्या अवतीभवती जे जे घडत असते, त्याचा काही एक परिणाम त्याच्या मनावर होतो. आपोआप त्याच्या मनात दाटून आलेले शब्द कागदावर उमटतात आणि त्यातून त्याला जाणवलेले दुःख कविता होऊन प्रकट होते. कवी इतर जगणाऱ्यांपेक्षा जास्त जिवंत असतो; याचे कारण, तो अखंड जागाच असतो. म्हणून तो जगातील वास्तव रेखाटत असतो.

साहित्य ग्रामीण असो, शहरी असो आदिवासी असो, कुठल्याही प्रकारचा साहित्य प्रकारअसो, त्या साहित्यामध्ये त्या प्रदेशाचा त्या काळाचा ठसा व म्हटलेला असतो. ग्रामीण साहित्याच्या संदर्भाने या साहित्यात कोण कोणत्या बाबी चा समावेश होतो. हे आपणाला पुढील बाबीतून दिसून येईल

"खेड्यतील माणसांच्या जीवनशेती, श्रद्धाविश्वे, शेती व निसर्ग यांच्याशी असणारा भावबंध, ग्रामव्यवस्थेतील बलुतेदारी, सामाजिक आर्थिक संबंधाची पारंपरिक व्यवस्था आधुनिक काळातील ग्रामपंचायत व्यवस्था, सहकार तत्त्वावर चालणाऱ्या विविध संस्था, यंत्रसंस्कृतीचे ग्रामीण जीवनावर झालेले अक्रमण व त्याचे परिणाम जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने बदलत चाललेले ग्रामीण जीवन ग्रामीण जीवनातील मानवसमूह, या मानवसमुहात असलेले ग्रामीण भागातील राजकारण व समाजकारण या राजकारणातील व समाजकारणातील व्यक्ती आणि व्यक्तिजीवन त्यांच्या भावना व जाणिवा या समुहातील ताणतणाव ही ग्रामीण साहित्याची आशयसूत्र असतात." १ ग्रामीण माणसाच्या जीवनविश्वातील ही आशयसूत्र लक्षात घेतल्यास ग्रामीण जीवन संस्कृती व संज्ञा संकल्पनेत अर्थतः सहज ज्ञात होते. तरीही अधिक विस्तशतपणे ही संज्ञा लक्षात घेण्यासाठी मराठी वाङ्मय कोशकारांनी कोशामध्ये ग्रामीण साहित्याचा



Shivaji Coll

जोड उल्लेख केलेला आहे, तोही येथे पाहता येण्यासारखा आहे "ग्रामीण साहित्याचा उल्लेख 'जानपद साहित्य' असाही केला जातो. विशेषत: १९४० पूर्वी ग्रामीण साहित्याला जानपद साहित्य असे म्हटले जात असे. त्याचा शब्दश: अर्थ या देशातील जनसामान्याचे साहित्य असा होतो. आपल्या देशातील ७० ते ७५ टक्के सामान्यजन सर्वसामान्य हे समानार्थी शब्दप्रयोग ठरतात. ग्रामीण साहित्य असा वेगळा साहित्यप्रकार नाही. तो एक वेगळा असा साहित्यप्रकार मानता येईलग्रामीण विभागाशी संबंधित असे जीवानानुभव ग्रामीण साहित्यातून व्यक्त होतात."२ ग्रामीण साहित्यास पूर्वी जानपद साहित्य असे म्हटले जात असल्याचा उल्लेख कोशामध्ये येतो आपल्या देशातील एक ८० टक्के जनता ग्रामीण भागात राहते हेही येथे खरे आहे.

मधुकर खराटे यांच्या धानाच्या सुकल्या बांद्या या कवितेतून येणार वास्तव ते पुढीलप्रमाणे मांडतात

"किती उन्हाच्या अजुनी झळा, कापूस सोया होत असे 'लिवलिवा'
अळी शोषतेअन्नरस, जातील किती बळी हे लिहून ठेवा
किती जरी केलेल्या घोषणा किंवा मलमपट्टी केली
धानाच्या सुकल्या बांद्या असुनी यंत्रणा भवताली"३

हे ग्रामीण भागातील जळजळीत वास्तव मधुकर गराटे यांच्या कवितेतून व्यक्त झाले आहे.

मधुकर गराटे यांच्या रस्त्यावरचे ठसे या कविता संग्रह संदर्भात ते असे म्हणतात," रस्त्यावरचे ठसे हा त्यांचा नवा कवितासंग्रह नावापासूनच थेट मातीशी नातं सांगणारा! क्षणात अंत:र्मुख पाहायला लावणारा! आपली जुनी माती आणि तिच्यावर होत असलेलं, होऊ घातलेलं प्रगतीच्या नावावरचं बेबंद आक्रमण बघून अस्वस्थ होणारी ही कविता! सारेच ऋतू बेभरवशाचे झाल्यानंतर नवनिर्मितीचाच पिके उदरात जोपासणाऱ्या तहानलेल्या मातीनं भरवसा तरी कुणावर ठेवायचा? भेगाळलेल्या मातीची तहान आण थेंबा थेंबाची वाट पाहून सुकलेलं उदास रान यांचा अस्वस्थ आकांत म्हणजेच 'रस्त्यांवरचे ठसे'! "४

ग्रामीण भागातील ग्रामीण संस्कृतीचे चित्रण कवी करतो.

"गढी उभी आहे वर्षानुवर्ष
रुढींच्या खपल्या
अंगा-खांद्यावर मिरवत
पावसाच्या धारा अंगावर झेलत"५

ग्रामीण जीवनात एकेकाळी ज्या ठिकाणाहून संपूर्ण गावाचा कारभार पाहिला जायचा ती सत्ताधीश गढी नेस्तनाबूत झाली आहे. गतवैभवाच्या आठवणी ताज्या राहिल्याचे कवी सांगतो आहे. आज असलेले गढीचे वास्तव कवी आपणा समोर मांडतो आहे. ग्रामीण जीवनात राजकारण खूप



PRINC
Shivaji Colle
Scanned by PDF Sc

वाढले आहे. गल्ली बोळात पुढारी निर्माण झाले आहेत. पण त्या सर्वांची वागण्याची रित वेगळी आहे. प्रत्येकाला स्वत: चे हितसंबंध जोपासावे वाटतात.

" गल्लीपासून दिल्लीपर्यंत
रीत आहे न्यारी
आयक माह्या गणपत
सारेच नते भ्रष्टाचारी
राजकारणाचा यांनी
अर्थच उलटा लावला
स्वार्थासाठी देश यांनी
बाजारात विकायला काढला."६

या आजच्या परिस्थितीचे चित्रण कवितेतून येताना दिसते. शेतकऱ्यांच्या वास्तव परिस्थितीचे चित्रण करताना कवी शिवाजी शिंदे लिहितात,

'इथं सगळेच बोंबा मारतात
महाग झालेत म्हणून कांदे
मात्र कोणालाच दिसत नाहीत
माझ्या शेतकऱ्याच्या जगण्याचे वांदे'

दैनंदिन जीवनात चार-दोन रुपयांनी कांदा महाग झाला तरी, दोन रुपयांनी कोथिंबीर महागली तरी किती गहजब होतो, सगळीकडे बोबा सुरू होते. कोथिंबीर येण्यासाठी काय आणि कसे पेरावे लागते, ती दिवसात उगवते, याचे जराही ज्ञान नसणारे लोक माध्यमांच्याद्वारे बौद्धिक घसरगुंड्या खेळू लागतात. सामान्य माणूस कसा अडचणीत आलाय वगैरे बारेमाप चर्चा होते. बिचारा पिकवणारा हे सारे ऐकतो, पाहतो आणि दुःखी होने एकाकी होतो. वेतन आयोगाच्या जराशा लांबणीने अस्वस्थ होणारे आणि एक तारखेऐवजी दोन तारखेला जर पगार झाला, तर आकाश-पाताळएक करणारे आम्ही 'कांद्याचे वांदे'चा बोंबाबोंब प्रयोग जोरात सुरू करतो. पण कवी शेतकऱ्यांच्या वास्तव जीवनाचा शोध घेतो. सरकारचे धोरण कुचकामी ठरणारे असतात. ग्रामीण भागामध्ये एक म्हण आहे .लबाडाच्या घरचे निमंत्रण जेवल्याशिवाय खरं नसतं असाच एक प्रसंग आपल्या कवितेतून कवी मांडतो,

'शासनाच्या मदतीची चातकाप्रमाणं वाट पाहत बसावं
तर कधी पंचनाम्याचं नाटक सहन करावं
शेवटी यातून काहीच मिळत नसल्यानं
शेतकऱ्यानं मात्र मरणालाच कवटाळावं'८

हे जिवंत चित्रण शिवाजी शिंदे यांच्या कवितेतून व्यक्त होत.

SHIVAJI HINGOLI
PRIN
Shivaji Coll



Scanned by PDF Sc

SHIVAJI COLLEGE HINGOLI

शेतकऱ्यांना निसर्ग ही साथ देत नाही त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांची ओरड कधीही न संपणारी आहे. त्यातच त्यांना पाऊस दगा देणार नाही म्हणून तो काहीबाही पेरतो. पण भरवशाच्या बेभरवसा होतोच. बियाणंच खोटं, काहीच उगवत नाही. उगवते ते फक्त प्रश्नांचे तण. ते कितीही काढले तरी पुन्हा उगवत असते. डॉ. शिवाजी शिंदे यांनी 'पोरीचं लगीन' या कवितेत हीच व्यथा मांडली आहे.

'कसंबसं पाव्हणं पोरीला बघायला आलं
पाहुण्याच्या मोठ्या हुंड्याच्या मागणीनं
बापाचं काळीज गेलं फाटून
सांगा बर, यंदा कसं व्हईल माझ्या पोरीचं लगीन ?'

असा केविलवाणा स्वर शेतकऱ्यांच्या तोंडून बाहेर पडतो. एकंदरीत साहित्यातून आजचे असणारे भयान वास्तव कवी लेखक मांडताना दिसून येते.

संदर्भ.

१)संपादक प्रभा गणोरकर वाङ्मयीन संज्ञा संकल्पनाकोश मुंबई २००१ २००
२)डॉ. विजया राजाध्यक्ष खंड-४ म.रा.सा.सं. मंडळ, मुंबई २००२पृ. १३५
३)मधुकर गराटे : रस्त्यावरचे ठसे संवेदना प्रकाशन, नागपूर २०१६ ,पृ.१५
४)मधुकर गराटे : रस्त्यावरचे ठसे संवेदना प्रकाशन, नागपूर २०१६ ,प्रस्तावना
५)प्रवीण वानखडे -अस्वस्थ युगाची कविता ,अनघादित्य प्रकाशन पृ.१५
६) प्रवीण वानखडे -अस्वस्थ युगाची कविता ,अनघादित्य प्रकाशन पृ.७५
७) शिवाजी शिंदे - कैवार शब्द शिवार प्रकाशन ,मंगळवेढा सोलापूर. पृ. २२
८) शिवाजी शिंदे - कैवार शब्द शिवार प्रकाशन ,मंगळवेढा सोलापूर. पृ. २१
९) शिवाजी शिंदे - कैवार शब्द शिवार प्रकाशन ,मंगळवेढा सोलापूर. पृ. २५

***

PRINCIPAL
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist Hingoli (MS)

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI



Scanned by PDF Scanner